# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


क्रमांक :- 2/एनजीसी/अधिसूचना/2013/ २३८
दिनांक : 13.02.2013

## अधिसूचना

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात प्रवेश क्षमतेतील वाढ - घट, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, अभ्यासक्रम बंद करणे, पीआयओ / एनआरआय च्या जागा, ड्युअल इंटीग्रेटेड प्रोग्राम व परदेशी संस्था तथा विद्यापीठ सहयोग या साठीअखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने www.dte.org.in/courseapproval2013 या लिंक वर ऑन लाईन द्वारे माहिती भरण्यासाठी दि. 10 फेब्रुवारी 2013 पर्यंत अंतिम मुदत देण्यात आलेली होती. त्यानुसार संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध झालेल्या अर्जांची तपासणी करुन त्यावर शासनाचे अभिप्राय परिषदेस विहित कालमर्यादेत सादर करण्यासाठी संबंधित संस्थाच्या दि. 27/12/2012, दि. 08/01/2013, दि. 15/01/2013, दि. 17/01/2013, 29/01/2013, 11/02/2013 व 12/02/2013 रोजी सुनावण्या झालेल्या आहेत. मात्र सदर सुनावण्यामध्ये काही संस्थाच्या सुनावण्या काही कागदपत्रामुळे प्रलंबित ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच काही संस्थानी त्यांच्या प्रवेशक्षमतेतील बदलाबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळी भरलेली असून सदर संस्था उपरोक्त सुनावणीस उपस्थित राहिलेल्या नाहीत.

म्हणुन ज्या संस्थाच्या सुनावण्या झालेल्या नाहीत अशा संस्थांची दि. 16.02.2013 रोजी या संचालनायात सकाळी 11.00 वाजता अंतिम सुनावणी घेण्यात येणार असून संबंधित संस्थानी सुनावणीस उपस्थित राहतांना परिषदेस सादर केलेला प्रस्ताव व खालील कागदपत्रांचा एक स्वतंत्र संच सादर करावा. तसेच सदर दिनांकानंतर कोणतीही सुनावणी घेण्यात येणार नाही याची संबंधित संस्थांनी नोंद घेण्यात यावी.

1. विहित नोंदणी शुल्क भरल्याची पावती
2. प्राचार्य / संचालक नियुक्तीस संबंधित विद्यापीठाच्या मान्यता / शैक्षणिक अर्हतची कागदपत्रे
3. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा अद्ययावत [latest] डेफिसिअन्सी रिपोर्ट (प्राचार्यांनी प्रमाणित केलेला)
4. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा परिषदेस सादर केलेला (पार्ट - I व पार्ट - II ) अर्ज
5. संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले दोन प्रतीत ॲनेक्चर - सी व डी (प्रपत्र).
6. सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेल्या जागा / बांधकाम / इमारतीचे नकाशे, ऑक्युपेन्सी प्रमाणपत्र इ.
7. अभ्यासक्रम बंद करणे किंवा प्रवेश क्षमता कमी करण्यासाठी अर्ज असल्यास संस्थेचा ठराव, संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र व कर्मचारी / विद्यार्थी यांचे समावेशन तसेच याबाबत उद्भवणा-या कायदेशीर बाबीस संस्था जबाबदार राहील या आशयाचे नोंदणीकृत हमीपत्र

(दयानंद मेश्राम)
प्र.संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

1) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर त्यांना कळविण्यात येते की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील संस्थाना याबाबत कळविण्यात यावे.
2) सिस्टीम मॅनेजर, तंत्र शिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, कार्यासन क्रमांक 3, संगणक कक्ष, मुंबई त्यांना कळविण्यात येते की, सदर अधिसूचना संचालनायाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करावी.



पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/१३/ ९३९
दि. १५/२/२०१३

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद, अधिनस्त प्राचार्य, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका संस्था यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव

सह संचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद